# नाशिक महानगरपालिका,नाशिक

**नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील वाहनचालक संवर्गातील रिक्त पदे तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात पदोन्नतीने भरणेकरिता कर्मचारी निवड समितीची बैठक.**

## -: बैठकीचे इतिवृत्त :-

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील वाहनचालक संवर्गातील रिक्त पदे तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात पदोन्नतीने भरणेकरिता दि.१२/१२/२०१२ रोजी नाशिक महानगरपालिका कर्मचारी निवड समितीची बैठक मा.आयुक्त सो. नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालिलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.आयुक्त सो. | :- | अध्यक्ष |
| २) उपआयुक्त (प्र.) | :- | सदस्य |
| ३) शहर अभियंता | :- | सदस्य |
| ४) कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) | :- | सदस्य |
| ५) मुख्यलेखापरीक्षक | :- | सदस्य |
| ६) क्रिडा अधिकारी तथा मागासवर्गीय अधिकारी | :- | सदस्य |
| ७) कामगार कल्याण अधिकारी | :- | पदसिध्द सचिव |

सदर बैठकीसाठी कोरम पुर्ण झाल्याने दुपारी ०४ : ०० वाजता कर्मचारी निवड समितीचे कामकाजास सुरवात झाली. बैठकीत खालीलप्रमाणे विषयांवर चर्चा झाली. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरतांना खालीलप्रमाणे सर्वसाधारण नियमावलीचा अवलंब करण्याबाबत समिती सदस्यांमध्ये सहमती झाली.

१) नाशिक महानगरपालिकेने सन २००९ मध्ये केलेल्या नविन सेवाप्रवेश नियमांना अद्याप मा.शासनाची मान्यता मिळालेली नसल्याने व वर्ग १ व २ ची अनुशेष बिंदु नामावली/रोष्टर रजिष्टर अद्याप शासनाकडुन प्रमाणित करुन मिळालेली नसल्याने आगामी सिंहस्थ कुंभमेळयाचे कामे तत्परतेने करणेसाठी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील सर्व संवर्गातील रिक्त पदे १००% पदोन्नती या तत्वावर तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात भरणेस मा.महासभा ठराव क्रमांक ३२७ दिनांक १८/१०/२०१२ अन्वये शिफारस करण्यात आलेली आहे त्यानुसार रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना १००% पदोन्नती तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात देण्यात यावी अशी समितीने शिफारस केली.

२) महानगरपालिकेच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेली अनुभवाची अट ऐवजी शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०८८/१०९/बारा, सामान्य प्रशासन विभाग दि.२५ ऑगस्ट १९८८ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००५/प्र.क.१/२००५/१२,सामान्य प्रशासन विभाग दि.२५ फेब्रुवारी २००५ मधील तरतुदीनुसार निम्न पदावर ३ वर्षांच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पुर्व अट म्हणुन विहीत करण्यास समितीने शिफारस केली.

३) पदोन्नतीकरिता विहीत शैक्षणिक अर्हतेमध्ये कोणत्याही प्रकारची शिथीलता देण्यात येऊ नये, मात्र भुतपुर्व नगरपालिकेतील नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिका ठराव नं.७५ दिनांक २१/६/१९८५ च्या ३ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक अर्हतेमध्ये शिथीलता देण्यात यावी.

४) अधिकारी/कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी चांगली आहे या धारणेच्या अधिन राहुन सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती देण्यात येतील यास्तव पदोन्नती दिल्यानंतर अधिकारी/कर्मचारी यांचे वर्तनाबाबत प्रतिकूल शेरा प्राप्त झाल्यास त्यानुसार सदर अधिकारी/कर्मचारी यांची पदोन्नती रदद करण्यात येईल.

५) अनुशेषाबाबत मागासवर्गीय दक्षता कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय/मा.शासनाकडुन बिंदु नामावली तपासतांना काही त्रुटी आढळुन आल्यास अगर पदोन्नतीबाबत काही वस्तुनिष्ठ आक्षेप प्राप्त झाल्यास त्याबाबत घेण्यात आलेला निर्णय पदोन्नत झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना बंधनकारक राहील.तसेच सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी त्या संवर्गात कार्यरत नियमित कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त स्वंतत्रपणे दर्शविण्यात यावी जेणेकरुन त्यासंवर्गात कार्यरत नियमित कर्मचाऱ्यांचे सेवाजेष्ठता यादीत कोणताही बदल होणार नाही.

६) सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नत्या हया, पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना जेष्ठ असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या/ कर्मचाऱ्यांच्या व ज्यांची प्रकरणे विचारार्थ खुली ठेवण्यात आलेली आहेत अशा अधिकाऱ्यांच्या/ कर्मचाऱ्यांच्या जेष्ठतेस बाधा न येण्याच्या अटीच्या अधिन राहुन देण्यात येतील.

७) नाशिक महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या सेवाप्रवेश नियमांना/त्यामध्ये होणाऱ्या बदलांना शासनाची मान्यता मिळण्याचे अधिन राहुन सदर पदोन्नती देण्यात येणार असल्याने पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना ते नियमित पदोन्नतीस पात्र आहेत असा त्याचा अर्थ होत नाही व या तदर्थ (Ad-hoc) स्वरुपातील पदोन्नतीमुळे नियमित पदोन्नतीचे कोणतेही हक्क त्यांना प्राप्त होणार नाहीत.

८) सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती नियमित कोटयातील रिक्त पदांवर तसेच सरळसेवा प्रविष्टांच्या कोटयातील रिक्त पदांवर देण्यात येणार असल्याने जसेजसे सरळसेवा प्रविष्ट उमेदवार उपलब्ध होतील तेव्हा तसेच भविष्यात अन्य कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास तेव्हा कोणतीही नोटीस न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यांना शेवटच्यास प्रथम (last come first go) याप्रमाणे पदावनत करण्यात येईल.

९) मागास प्रवर्गातील पदोन्नती मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांनी जात वैधताप्रमाणपत्र सादर केले नसल्यास त्यांनी ३ महिन्यांचे आंत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडील जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील अन्यथ: त्यांना त्यांचे मुळ पदावर पदावनत करण्यात येईल.

१०) उपरोक्तप्रमाणे पदोन्नतीसाठी पात्र होणाऱ्या कर्मचारी/अधिका-यांपैकी ज्या अधिकारी/कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आलेला असेल अशा कर्मचाऱ्यांना केवळ कार्यात्मक पदोन्नती (Functional Promotion) देय राहील.

११) ज्या पदांकरिता निम्नश्रेणीतील संवर्गातुन पदोन्नतीकरिता कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत अशा पदांवर सरळसेवा भरतीव्दारे नियुक्ती करण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला.

**<u>विषय क्रमांक ०१</u> :- वाहनचालक** या संवर्गात पात्र कर्मचायांना पदोन्नती देणे.

| | | |
|---|---|---|
| **<u>पदोन्नतीचे पदनाम</u>** | :- | **वाहनचालक** |
| वेतनश्रेणी | :- | ५२००-२०२०० + २४०० ग्रेड वेतन |
| अ) एकुण मंजुर पदे | :- | २०० |
| ब) भरलेली पदे | :- | १८८ |
| क) रिक्त पदे | :- | १२ |
| ड) जेसीबी मशिन ऑपरेटर व क.लिपीक पदावर पदोन्नतीमुळे रिक्त होणारी पदे | :- | ३ |
| इ) एकुण रिक्त पदे | :- | १५ |

**<u>पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.</u>**

१) जड वाहनचालक परवाना

२) क्लिनर पदावरील कामाचा ५ वर्षांचा अनुभव

३) मोटार व्हेईकल ॲक्ट १९४९ प्रमाणे शारिरीकदृष्टया तंदुरूस्त.

**<u>वाहनचालक या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..</u>**

| अ.क्र | | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | ससा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | |
| १ | मंजुर पदे | २६ | १४ | ६ | ५ | ७ | ४ | ४ | १३४ | २०० |
| २ | कार्यरत पदे | २६ | १४ | ६ | ५ | ४ | ४ | २ | १२७ | १८८ |
| ३ | रिक्त पदे | - | - | - | - | ३ | - | २ | ७ | १२ |
| ४ | जेसीबी मशिन ऑपरेटर व क.लिपीक पदावर पदोन्नतीमुळे रिक्त होणारी पदे | - | - | - | - | - | - | - | ३ | ३ |
| ५ | एकूण रिक्त पदे | - | - | - | - | ३ | - | २ | १० | १५ |

वाहनचालक या पदावर पदोन्नतीसाठी मनपा आस्थापना परिशिष्टावर निम्न श्रेणीतील साखळी पद मोटार क्लीनर हे आहे. परंतू सदर पदावर सद्यस्थितीत श्री.राकेश कांतीलाल सापरीया हे एकमेव कर्मचारी कार्यरत असून ते जडवाहन चालविण्याचा परवाना धारण करित नसल्याने वाहनचालक पदावरील पदोन्नतीस पात्र ठरत नाहीत.

मनपा आस्थापना परिशिष्टावर वाहनचालक या पदावरील कर्मचायांची अपुरी संख्या लक्षात घेता चतुर्थश्रेणीतील विविध संवर्गातील जे कर्मचारी वाहनचालक या पदासाठी शैक्षणीक पात्रता धारण करीत आहेत अशा

कर्मचायांना कामकाजाचे सोईने वाहनचालक म्हणून कामकाज नेमून देण्यात आलेले आहे. अशा प्रकारे सलग तिन वर्षे कामकाजाचे सोईने वाहनचालक म्हणून काम करणा-या एकूण ३८ चतुर्थश्रेणीतील कर्मचायांना मनपा आदेश क्र.१४५५ दिनांक ०९/११/२०११ अन्वये वाहनचालक या पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देणेत आलेली आहे.

चतुर्थश्रेणीतील सफाई कामगार,बिगारी,मलेरिया फिल्ड वर्कर, वॉर्डबॉय, हेल्पर,वॉचमन या संवर्गातील जे कर्मचारी वाहनचालक या पदाची शैक्षणीक पात्रता धारण करित आहेत अशा एकूण १४ कर्मचा-यांना कामकाजाचे सोईने वाहनचालक म्हणून कामकाज सोपविण्यांत आलेले असून, प्रथमतः त्यांचा रिक्त पदांवर पदोन्नतीकरिता विचार करण्यात आला.

**प्रवर्ग :- भटक्या जमाती (क)** **रिक्त पदे :- ०३**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | जात | शैक्षणिक पात्रता | जन्म तारीख | का.सो.वा.चालकाचे काम सोपविल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भटक्या जमाती (क) या प्रवर्गातुन का.सो.वाहनचालक म्हणून कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी कर्मचारी उपलब्ध नाही. | | | | | | | | |

उपरोक्तप्रमाणे भटक्या जमाती (क) या प्रवर्गातुन पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्याने अंतर्गत परिवर्तनाच्या नियमानुसार विमुक्त जाती (अ) व भटक्या जमाती (ब) व (ड) या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीकरिता विचार करण्यात आला ते खालीलप्रमाणे.

**प्रवर्ग :- विमुक्त जाती/भटक्या जमाती** **रिक्त पदे :- ०३**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | जात | शैक्षणिक पात्रता | जन्म तारीख | का.सो.वा.चालकाचे काम सोपविल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ८४५ | धोत्रे संजय रामचंद्र | बिगारी | वडारी विजा अ | ८ वी पास जड वाहन परवाना | ११.६.०७ | २६.५.०८ | श्री.धोत्रे यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल असून न्यायप्रविष्ठ आहे |

उपरोक्त नमुद कर्मचारी यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल असल्याने सदर गुन्हयामध्ये न्यायालयाच्या निकालाच्या अधिन राहुन श्री.धोत्रे यांना विमुक्त जाती/भटक्या जमाती (क) या प्रवर्गातुन अंतर्गत परिवर्तनाचे नियमानुसार पदोन्नती देण्यात यावी असा पदोन्नती समितीने निर्णय घेतला.

**प्रवर्ग :- विशेष मागास प्रवर्गातून** **रिक्त पदे:-०२**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | जात | शैक्षणिक पात्रता | जन्म तारीख | का.सो.वा.चालकाचे काम सोपविल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातुन का.सो.वाहनचालक म्हणून कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी कर्मचारी उपलब्ध नाही. | | | | | | | | |

वाहनचालक या पदावर पदोन्नतीसाठी विशेष मागास प्रवर्गातून कामकाजाचे सोईने वाहनचालक म्हणून कामकाज नेमून दिलेले कर्मचारी उपलब्ध नाही.

**प्रवर्ग :- सर्वसाधारण** **रिक्त पदे:- १०**

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | जन्म तारीख | का.सो.वाहन चालक पदाचे काम सोपविल्या चा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | काळे राजु रामचंद्र, सफाई कामगार | महार | २री पास जडवाहनपरवाना | १७.६.९७ | २९.१२.०३ | पदोन्नतीस लेखी नकार दिलेला आहे. |
| २. | काळे संजयकुमार नामदेव, सफाईकामगार | मांग गारुडी | ५वी, जडवाहनपरवाना | ९.४.९९ | २९.१२.०३ | पदोन्नतीस लेखी नकार दिलेला आहे. |
| ३. | गायकवाड किशोर लक्ष्मण, सफाई कामगार | महार | ४थी जडवाहनपरवाना | २६.१२.०१ | २९.१२.०३ | |
| ४. | याळीस अतुल बाजीराव, सफाई कामगार | मराठा | ६वी पास जडवाहनपरवाना | ३.७.९५ | २०.९.०५ | पदोन्नतीस लेखी नकार दिलेला आहे. |
| ५. | बागूल दिनकर एकनाथ, | तेली | ५वी पास, जडवाहनपरवाना | ३.७.९५ | ११.२.०८ | पदोन्नतीस लेखी नकार |

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | जन्म तारीख | का.सो.वाहन चालक पदाचे काम सोपविल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | सफाई कामगार | | | | | दिलेला आहे. |
| ६. | धोत्रे संजय रामचंद्र, बिगारी | वडारी | ८वी पास, जडवाहनपरवाना | ११.६.०७ | २६.५.०८ | श्री.धोत्रे यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल असून न्यायप्रविष्ठ आहे |
| ७. | मगर अजित मुरलीधर, बिगारी | न्हावी | एसएससी, जडवाहनपरवाना | १.५.०३ | २०.८.०९ | |
| ८. | सावंत विजय कारभारी, सफाई कामगार | मराठा | ८वी पास जडवाहनपरवाना | १.७.९५ | १६.२.१० | पदोन्नतीस लेखी नकार दिलेला आहे. |
| ९. | भोळे रविंद्र अंकुश, मलेरिया फिल्ड वर्कर | महार | ६वी पास जडवाहनपरवाना | २८.१२.९९ | १६.२.१० | |
| १०. | श्री काठे रविंद्र राजाराम, बिगारी | माळी | १२वी पास,तारतंत्री परिक्षा पास,जडवाहन परवाना, | १.५.०३ | १६.२.१० | |
| ११. | जाधव शैलेश आनंदराव, वॉर्डबॉय | महार | ६वी पास जडवाहनपरवाना | १.५.०३ | १६.२.१० | |
| १२. | बेलगांवकर ज्ञानेश्वर सदाशिव, बिगारी | तेली | ७वी पास जडवाहनपरवाना | ३.९.०३ | १६.२.१० | |
| १३. | श्री कर्पे संजय बन्सीलाल, हेल्पर | मराठा | ६ वी पास,जडवाहन परवाना | २०.५.९६ | सन १९९७ २४.१.११ | |
| १४. | मोहिते प्रकाश पंडीत, वॉचमन | मातंग | १०वी पास ना.स.दल प्राथमीक कोर्स, जडवान परवाना | १.५.०३ | ३.१.१२ | |

उपरोक्त अ.क्र.१,२,४,५,८ वर नमुद श्री.काळे राजु, श्री.काळे संजयकुमार, श्री.याळीस, श्री.बागुल व श्री.सावंत हे कर्मचारी वाहनचालक या पदाची शैक्षणीक पात्रता धारण करतात मात्र त्यांनी वाहनचालक या नियमित पदावरील पदोन्नतीस लेखी नकार दिलेला असल्याने त्यांचा पदोन्नतीकरिता विचार करण्यात आला नाही. तसेच अ.क्र.६ वर नमुद श्री.धोत्रे संजय रामचंद्र,बिगारी यांना विजा/भज (क) या प्रवर्गातुन पदोन्नती देण्यास समितीने शिफारस केलेली असल्याने सदर कर्मचारी वगळुन अ.क्र.३,७,९,१०,११,१२,१३,१४ वर नमुद कर्मचारी श्री.गायकवाड किशोर लक्ष्मण, श्री.मगर अजित मुरलीधर, श्री.भोळे रविंद्र अंकुश, श्री.काठे रविंद्र राजाराम, श्री.जाधव शैलेश आनंदराव, श्री.बेलगांवकर ज्ञानेश्वर सदाशिव, श्री.कर्पे संजय बन्सीलाल, श्री.मोहिते प्रकाश पंडीत यांना खुल्या गटातुन पदोन्नती देण्यास समितीने शिफारस केली.तसेच अ.क्र.९ ते १४ वर नमुद कर्मचारी हे पदोन्नतीकरिता आवश्यक अनुभवाची ३ वर्षांची अट पुर्ण करत नाहीत तथापि वाहनचालकांची आवश्यकता लक्षात घेता सदर कर्मचाऱ्यांची अनुभवाची अट शिथील करण्यात येऊन त्यांना पदोन्नती देण्यात यावी असा पदोन्नती समितीने निर्णय घेतला. त्यानुसार खालील नमुद कर्मचारी खुल्या गटातुन वाहनचालक पदावर पदोन्नतीस पात्र ठरतात.

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १. | श्री.गायकवाड किशोर लक्ष्मण | |
| २. | श्री.मगर अजित मुरलीधर | |
| ३. | श्री.भोळे रविंद्र अंकुश | |
| ४. | श्री.काठे रविंद्र राजाराम | |
| ५. | श्री.जाधव शैलेश आनंदराव | |
| ६. | श्री.बेलगांवकर ज्ञानेश्वर सदाशिव | |
| ७. | श्री.कर्पे संजय बन्सीलाल | |
| ८. | श्री.मोहिते प्रकाश पंडीत | |

उपरोक्तप्रमाणे खुल्या गटातील १० पदांवर ८ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेकरिता शिफारस करण्यात आलेली आहे. वाहनचालक या संवर्गात उपरोक्त कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्यानंतरही खुल्या गटात २ पदे व विमुक्त

जाती/भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाचा ४ पदांचा अनुशेष शिल्लक राहत असल्याने सदर पदांवर चतुर्थश्रेणीतील जडवाहन चालक परवाना धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देता येईल. त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचारी Consideration Zone मध्ये येत आहेत.

**प्रवर्ग :- भटक्या जमाती (क)** **रिक्त पदे :- ०२**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | जात | शैक्षणिक पात्रता | जन्म तारीख | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ९१ | बेंद्रे लक्ष्मीकांत प्रताप | सुरक्षा रक्षक | धनगर भज-क | बीए, नास दल कोर्स,इमटंक-३०, एमएससीआयटी,जडवाहन परवाना | ३१.१२.७३ | ११.६.०७ | |

उपरोक्त अ.क्र.१ वर नमुद कर्मचारी श्री.बेंद्रे हे पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करत असल्याने त्यांना भटक्या जमाती (क) या प्रवर्गातुन वाहनचालक या पदावर पदोन्नती देण्यास पदोन्नती समितीने शिफारस केली. तसेच भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील २ अनुशेषाच्या पदावर पदोन्नतीकरिता केवळ एकच पात्र कर्मचारी उपलब्ध असल्याने उर्वरीत १ पदांकरिता अंतर्गत परिवर्तनाच्या नियमानुसार विमुक्त जाती (अ) व भटक्या जमाती (ब) व (ड) या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीकरिता विचार करण्यात आला ते खालीलप्रमाणे.

**प्रवर्ग :- विमुक्त जाती/भटक्या जमाती(क)** **रिक्त पदे :- ०२**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | जात | शैक्षणिक पात्रता | जन्म तारीख | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६९ | इंदारखे सुभाष सोनु | शिपाई | कहार भज-ब | ८ वी पास, जडवाहन परवाना | १४.६.५९ | ५.१०.८९ | पदोन्नतीस ा लेखी नकार दिलेला आहे. |
| २ | ४७ | दराडे ज्ञानेश्वर पांडुरंग | फायरमन | वंजारी भ.ज-ड | १२ वी पास,इ.म.टंक,बेसिक ज.वा परवाना,फुल फस्ट एड, | १५.५.६८ | २०.९.९४ | |
| ३ | ५९ | गोसावी राजेंद्र रत्नाकर | फायरमन | गोसावी भज-ब | बी.कॉम.नस दल बेसिक ट्रेनिंग,फायर फाय.वॉर्डन कोर्स,एलएसजीडी,जड वाहन परवाना. | १३.०६.६९ | २०.९.९४ | |
| ४ | ७३ | मेंदरे संतोष पुंडलिक | फायरमन | गवळी भज-ब | बी कॉम बेसीक फा.फा, नास अग्निशमन फुल फर्स्ट एड, मटं४० प्रा.वी.संगणक कोर्स, आयटीआय, एलएसजीडी,प्राथमीक अग्निशामन प्रशिक्षण मुंबई, जड वाहन परवाना | २०.६.७१ | २०.९.९४ | |
| ५ | ३८३ | शेळके शिवाजी रघुनाथ | बिगारी | वंजारी भज.-ड | ९ वी पास, जडवाहन परवाना | १७.३.६५ | १.५.०३ | |
| ६ | ६७ | वाघ अजय बबनराव | हेल्पर | वंजारी भ.ज.-ड | एचएससी, जडवाहन परवाना, आयटीआय मॅकेनीक (मोटार व्हेईकल) एनसीव्हीटी,व्होकेशनल डिप्लोमा इन ॲटोमोबाईल | २६.१.७७ | ११.६.०७ | |

उपरोक्त नमुद अ.क्र. १ वर नमुद कर्मचारी श्री.इंदारखे पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करत आहेत मात्र त्यांनी वाहनचालक या पदावर पदोन्नतीस लेखी नकार दिलेला असल्याने त्यांचा पदोन्नतीकरिता विचार करण्यात आला नाही. तसेच अ.क्र.२ वर नमुद कर्मचारी श्री.दराडे ज्ञानेश्वर पांडुरंग व अ.क्र.३ वर नमुद श्री.गोसावी राजेंद्र रत्नाकर हे पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करतात मात्र ते अग्निशामक विभागासारख्या अत्यावश्यक सेवेत फायरमन या पदावर कार्यरत असल्याने व या संवर्गात कर्मचारी संख्या कमी असल्याने त्यांना वाहनचालक या पदावर पदोन्नती दिल्यास त्याचा विपरित परिणाम अत्यावश्यक सेवेवर होईल ही बाब विचारात घेऊन समितीने त्यांना त्यांचे वाहनचालक या पदावरील पदोन्नतीबाबतचे आदेश हे अग्निशामक विभागाकडील रिक्त पदे सरळसेवेने भरल्यानंतर व त्यांचे आवश्यक प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर निर्गमित करण्यात यावे असा निर्णय घेतला.

**प्रवर्ग :- विशेष मागस प्रवर्ग** **रिक्त पदे :- ०२**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | जात | शैक्षणिक पात्रता | जन्म तारीख | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | चिंचले राजेंद्र नारायण | रोड मुकादम | कोष्टी विमाप्र | ९ वी पास,जडवाहन परवाना | ७.१२.६२ | २३.७.९७ | |
| २ | ८५५ | बाप्ते निळकंठ उत्तमराव | बिगारी | कोष्टी विमाप्र | १०वी पास, जडवाहन परवाना | १.७.७४ | १२.६.०७ | |

उपरोक्तनमुद अ.क्र. १ व २ वर नमुद श्री.चिंचले राजेंद्र नारायण,श्री.बाप्ते निळकंठ उत्तमराव हे कर्मचारी पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करत असल्याने त्यांना विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातुन वाहनचालक या पदावर पदोन्नती देण्यास समितीने शिफारस केली.

**प्रवर्ग :- सर्वसाधारण प्रवर्ग** **रिक्त पदे :-२**

| अ. क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | जात | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | नेमणूक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | गायकवाड भानुदास नामदेव | व्हॉलमन | मराठा स.सा | ७वी पास, जडवाहन परवाना | ५.१२.५६ | ३.१२.८० | ३.१२.८० | |
| २ | ६९ | इंदारखे सुभाष सोनु | शिपाई | कहार भज-ब | ८ वी पास, जडवाहन परवाना | १४.६.५९ | ५.१०.८९ | ५.१०.८९ | पदोन्नतीस लेखी नकार दिलेला आहे. |
| ३ | १३ | जोपुळे विलास नथु | हेल्पर | मराठा स.सा | ७ वी पास,इलेक्ट्रशियन कोर्स पास,जडवाहन परवाना | २२.१०.७१ | १.२.९२ | १.२.९२ | जेसीबी ऑप. पदाकरिता पात्र |
| ४ | १५ | कानडे संजय जगन्नाथ | फायरमन | कलाल इमाजा | १०वी पास,अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम,मुंबई ट्रान्सपोर्ट मोटार व्हेईकल. | २.११.६९ | २६.६.९२ | २०.९.९४ | लिडींग फायरमन पदावर पात्र |
| ५ | २५ | चंद्रमोरे देविदास अंकुश | फायरमन | महार अजा | ११वी नागरी संरक्षण कोर्स प्रा.अग्नी कोर्स,राज्य अग्निशमन कोर्स,सब ऑफीसर कोर्स नोव्हेंबर ०९, जडवाहन परवाना | १९.१०.६४ | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ६ | २९ | लाड रविंद्र अमृत | फायरमन | खाटीक अजा | १०वी पास,ना.संरक्षण हाय ॲव्हरेज,सिव्हील डिफेन्स कोर्स, हाय व्हरेज,प्रा.अ.प्र.पाठयपुस्तक मुंबई जडवाहन परवाना,म इं टंक ४० | २२.६.६५ | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ७ | ३८ | खुळगे शिवाजी लक्ष्मण | फायरमन | मराठा स.सा | बी कॉम,बीएड,म इ टंक,नागरी संरक्षक दल फायर,तारतंत्री परवाना, ,राज्य अग्निशमन प्रशिक्षण कोर्स, मुंबई, जडवाहन परवाना, सब ऑफीसर कोर्स | १.०६.६६ | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ८ | ४७ | दराडे ज्ञानेश्वर पांडुरंग | फायरमन | वंजारी भ.ज-ड | १२ वी पास,इ.म.टंक,बेसिक ज.वा परवाना,फुल फस्ट एड, | १५.५.६८ | २०.९.९४ | २०.९.९४ | विजा/भज प्रवर्गातून पात्र |
| ९ | ४८ | पगार सोमनाथ रामभाऊ | फायरमन | मराठा स.सा | बी.एस्सी. बेसीक ट्रेनिंग हाउस फायर वॉर्डन,फुल फर्स्ट एड,आय टी आय कोर्स,म ई टंक, संगणक परिचलन कोर्स,राज्य अग्निशमन कोर्स, प्रशिक्षण मुंबई पास सप्टें-०९,राष्ट्रीय अग्निशमन सेवा माहाविद्यालय नागपूर २७ वा सब ऑफिसर कोर्स, जड वाहन परवाना | १.०६.६८ | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| १० | ५३ | मतवाड शिवाजी गित | फायरमन | पावरा अज | १२ वी,नास दल कोर्स,प्रा.प्र फायर फायटीग कोर्स, राज्य अग्निशामन कोर्स प्रशिक्षण मुंबई, वाहन परवाना | ५.०६.६८ | २०.९.९४ | २०.९.९४ | |

उपरोक्त अ.क्र.३ वर नमुद श्री.जोपळे विलास नथु यांना जेसीबी मशिन ऑपरेटर या पदावर आणि अ.क्र.४ वर नमुद श्री.कानडे संजय जगन्नाथ,फायरमन यांना लिडींग फायरमन या पदावर पदोन्नती देणेकरिता शिफारस करण्यात आलेली असल्याने त्यांचा वाहनचालक या पदावर पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला नाही. तसेच अ.क्र.२ वर नमुद कर्मचारी श्री.इंदारखे सुभाष सोनु यांनी वाहनचालक या पदावर पदोन्नतीसाठी लेखी नकार दिलेला असल्याने त्यांचे नावाचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला नाही यास्तव अ.क्र.१ व ५ वर नमुद कर्मचारी श्री.गायकवाड भानुदास नामदेव,व्हॉलमन व चंद्रमोरे देविदास अंकुश हे पदोन्नतीसाठी आवश्यक अर्हता धारण करत असल्याने त्यांना वाहनचालक या पदावर पदोन्नती देणेस समितीने शिफारस केली मात्र यापैकी श्री.चंद्रमोरे हे अग्निशामक विभागासारख्या अत्यावश्यक सेवेत फायरमन या पदावर कार्यरत असल्याने व या संवर्गात कर्मचारी संख्या कमी असल्याने त्यांना वाहनचालक या पदावर पदोन्नती दिल्यास त्याचा विपरित परिणाम अत्यावश्यक सेवेवर होईल ही बाब विचारात घेऊन समितीने त्यांना त्यांचे वाहनचालक या पदावरील पदोन्नतीबाबतचे आदेश हे अग्निशामक विभागाकडील रिक्त पदे सरळसेवेने भरल्यानंतर व त्यांचे आवश्यक प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर निर्गमित करण्यात यावे असा निर्णय घेतला.

याप्रमाणे उपरोक्त विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. कार्यपत्रिकेवरील विषय संपल्याने समितीचे कामकाज संपल्याचे मा. समिती अध्यक्ष यांनी जाहीर केले

१) आयुक्त सो. :-

२) उपआयुक्त सो.(प्र.) :-

३) शहर अभियंता :-

४) कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) :-

५) मुख्यलेखापरिक्षक :-

६) मागासवर्ग अधिकारी :-

७) कामगार कल्याण अधिकारी :-